# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. २६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०१/२०१८

**१) आजाराला कंटाळुन विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ११/०१/२०१८ चे १७.३० ते २३.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचे वडील मृतक सुदाम माहादेव अनकर वय ५० वर्ष, रा. तुडका हे संध्याकाळी बाहेर फिरायला गेले असता ते रात्री घरी परत आले नाही म्हणुन वडीलाचा शोध घेतला असता तामसवाडी येथील हरीराम बोपचे यांचे शेतातील विहीरी जवळ मृतकचे पाण्यात उडी घेतल्याचा संशय आल्याने गळ टाकुन पाहणी केली असता मृतकचे प्रेत गळाला लटकुन बाहेर आल्याने मृतकने मुळवादयाच्या आजाराला कंटाळुन विहीरीत उडी मारुन आत्महत्या केल्याने फिर्यादी पसतीश सुदाम अनकर वय ३६ वर्ष, रा. तुडका यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**२) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान तरुणीचा मृत्यु . :–**

दिनांक १२/०१/२०१८ चे ०१.२० वाजता. दरम्यान यातील मृतक वैष्णवी विनोद बुराडे वय १८ वर्ष, रा. सोमलवाडा हिने आपले घरी विष प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता डॉ. निर्वाण यांचे खाजगी रुग्नालयात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/१८ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तुमाने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**३) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १२/०१/२०१८ चे १५.३०ते १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी काळी पिवळी क्र. एमएच ३१/८०५९ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दिघोरी टिपॉईट येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. मडावी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मडावी पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ११/०१/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी काळी पिवळी क्र. एमएच क्र. एमच ३१ एपी /८११२ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दिघोरी टिपॉईटयेथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. मडावी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मडावी पो.स्टे. दिघोरी हे करीत आहे.

**४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १२/०१/२०१८ चे ११.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी दुर्गे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी — ०८ तीन सिटर वाहनांवरती— ११ केसेस व ईतर वाहनांवरती —८१ केसेस करण्यात आले आहे.

(पो. नी. एस. आर. तेलुरे )
जिवीशा शाखा
भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.